# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र.
०२०–२५६०१३५३
ई–मेल
iqac@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष


संदर्भ क्र.:आयक्यूएसी/१५८

दि :– २४ जुलै, २०१८

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विद्यापीठ शैक्षणिक विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय :– 'शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक' (ARC) यांची ऑनलाईन पध्द्तीने माहिती सादर करणेबाबत.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत संशोधन प्रकल्प योजना, इनोव्हेशन परिषद, विद्यार्थ्यांसाठी संशोधन स्पर्धा (अविष्कार, अन्वेषन) यासारखे उपक्रम राबविले जातात. बहुतांष महाविद्यालये/ परिसंस्थांमधील एका अध्यापकाचे 'शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक' **(ARC)** म्हणून नामनिर्देशन करण्यात आलेले आहे. ज्या महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थी अविष्कार स्पर्धेमध्ये भाग घेतात, त्यांना रूपये ३०००/– मानधन व संबंधित महाविद्यालय/परिसंस्था यांना स्टेशनरी व इतर खर्चासाठी रूपये ७०००/– अर्थसहाय देण्यात येते. हे अर्थसहाय्य आणि मानधन धनादेशाच्या माध्यमातून अदा करण्यात येते, या सर्व प्रक्रियेसाठी अधिक मनुष्यबळ वळवावे लागते व वेळेचा देखील अपव्यय होतो. तसेच सर्व शैक्षणिक व संशोधन समन्वयकांशी वेळीच व जलद संपर्क साधणे अडचणीचे ठरते. यावर उपाय म्हणून सर्व शैक्षणिक व संशोधन समन्वयकांची व महाविद्यालये/परिसंस्थांच्या बॅंक खात्यांची माहिती **ऑनलाईन** पध्दतीने मागविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तरी खालील नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक व संशोधन समन्वयकांची माहिती दिनांक ३१ जुलै, २०१८ पर्यंत **ऑनलाईन** पध्दतीने सादर करावी.

१. ज्या महाविद्यालय/परिसंस्थांनी त्यांच्याकडील पूर्णवेळ अध्यापकास यापूर्वीच 'शैक्षणिक व संशोधन समन्वयक' **(ARC)** म्हणून नामनिर्देशित केलेले आहे त्यांची माहिती,
२. ज्या महाविद्यालय/परिसंस्थांनी त्यांच्याकडील एका पूर्णवेळ अध्यापकाचे अद्याप 'शैक्षणिक व संशोधन समन्वयक' **(ARC)** म्हणून नामनिर्देशन केलेले नाही त्यांनी सदरचे नामनिर्देशन करून त्यांची माहिती,
३. विद्यापीठातील सर्व विभाग/केंद्रांनी त्यांच्याकडील एका पूर्णवेळ अध्यापकाचे 'शैक्षणिक आणि संशोधन समन्वयक' **(ARC)** म्हणून नामनिर्देशन करून त्यांची माहिती,

**ऑनलाईन** पध्दतीने माहिती सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे आहे.

**http://bcud.unipune.ac.in/root/login.aspdx ➡ College/Department login ➡ Nomination for ARC**

ज्या महाविद्यालय/परिसंस्थांची माहिती **ऑनलाईन** पध्दतीने उपलब्ध होणारी आहे, त्या महाविद्यालय/परिसंस्था यांच्या बॅंक खात्यामध्ये अर्थसहाय्य/मानधन जमा करण्यात येईल. तसेच ई–गव्हर्नन्सच्या माध्यमातून संपूर्ण माहिती उपलब्ध असल्यास शासनाच्या धोरणास अनुसरून शासकीय कामकाजातील पारदर्शकता व उत्तरदायित्व यामध्ये स्पष्टता येईल. तसेच प्रशासकीय कामात गतिमानता येईल. सदर कामी आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे.

कळावे,

आपला,

(डॉ.प्रफुल्ल पवार)
संचालक
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष